# पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात मुदित व्हा

१ जुलै, २०२०

आत्मीय वाचकांनो,

अलीकडे, मी चंद्राच्या अधिकच प्रेमात पडलो आहे. अनेक वर्षे मी डोंगराळ, वन्यप्रदेशात वास्तव्य केले, जिथे पावसाचा वर्षाव किंवा त्याची रिमझिम कायमच सुरू असे आणि मी चंद्राचा विचार क्वचितच केला असेल. सध्या, मी नैऋत्य अमेरीकेतील ॲरीझोनाच्या उंच वाळवंटी भागात राहात असल्यामुळे, सहसा रोज रात्री चंद्राचे दर्शन घेत असतो, कधीकधी सकाळी आणि दुपारीदेखील चंद्राचे दर्शन घेतो! चंद्राचे कलेकलेने पूर्णत्वाकडे जाणे आणि मग पूर्णत्वाकडून छोटीशी चंद्रकोर बनण्याच्या दिशेने जाणे मला खूपच आवडते. पण पौर्णिमेच्या चंद्र हा सदोदित माझ्या मनाला आणि हृदयाला सर्वाधिक मंत्रमुग्ध करतो. तो किती निकट, किती संपूर्ण, किती *जिवंत* वाटतो.

भारतीय पवित्र शास्त्रग्रंथांनी ज्याला वर्षभरातील सर्वाधिक मंगलमय पूर्णचंद्र मानले आहे आणि जो पौर्णिमेचा चंद्र श्रीगुरूंना समर्पित आहे, त्याची अनुभूती करण्याची सुसंधी, आपल्याला गुरुपौर्णिमेच्या कालावधीत मिळते. आपल्याला श्रीगुरूंकडून जो कृपाप्रसाद आणि जे ज्ञान प्राप्त होते, त्यासाठी श्रीगुरूंना कृतज्ञता अर्पित करून त्यांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांची आराधना करण्यासाठी हा दिवस विशेषत्वाने शक्तिपूर्ण आहे.

खरे तर, प्रत्येक पौर्णिमेचा पूर्णचंद्र म्हणजे रात्रकालीन आकाशातील एक सुंदर आणि उद्बोधक उपस्थिती असून, श्रीगुरूंकडून आपल्याला प्राप्त होत असलेल्या कृपेच्या प्रचुरतेची आणि आपल्या स्वतःच्या अस्तित्वातील श्रीगुरूंच्या परिपूर्ण उपस्थितीचे एक उचित स्मरण करवून देणारे तत्त्व आहे असे आपण मानू शकतो. तुम्ही कधी याविषयी विचार केला आहे का, की सूर्याच्या दृष्टिकोनातून चंद्र हा सदासर्वदा संपूर्णच असतो, कारण चंद्र हा सूर्याला नेहमी सामोराच असतो. त्याचप्रमाणे श्रीगुरूदेखील नेहमी आंतरिक प्रकाशाच्या परम स्रोताशी, म्हणजेच भगवंताशी सदैव पूर्णतया एकरूप असतात आणि त्या कृपेच्या दैवी प्रकाशाला आणि प्रज्ञानाला आपल्यावर संपूर्णतया प्रतिबिंबित करतात.

‘पूर्ण’ हा संस्कृत शब्द आहे. अनेक वर्षांपूर्वी गुरुपौर्णिमेच्या दिवशी मला या चंद्रासमवेत आणि ‘पूर्ण’ या शब्दासमवेत असलेल्या माझ्या अतूट नात्याचा अनुभव आला होता. मी आणि माझी पत्नी—अनेक व्यक्तिगत तसेच व्यावसायिक कारणांसाठी—युरोपमध्ये होतो आणि टॅक्सीत बसून एका भल्या पहाटे आम्ही बर्लिन विमानतळाकडे जात होतो, तेव्हा मला

पश्चिमेस मावळणाऱ्या स्वर्णिम गुरुपौर्णिमेच्या चंद्राचे, ओझरते दर्शन झाले, ज्या वेळी सूर्यदेखील पूर्वेकडे उदयास येत होता. पौर्णिमेचा चंद्र तुरळक ढगांच्या पडद्याआडून अवखळपणे लपंडाव खेळत होता.

माझ्या असे लक्षात आले की, जर्मनीतील सूर्योदयाच्या या समयी, न्यूयॉर्क येथे बरीच रात्र झालेली असणार आणि मग मी कल्पना केली की, कदाचित श्रीगुरुमाईदेखील गुरुपौर्णिमेच्या या चंद्राकडे पाहत असतील व श्री मुक्तानंद आश्रमावरील रात्रीच्या आकाशात पसरलेल्या त्याच्या तेजस्वितेला न्याहाळत असतील. त्या क्षणी मला गुरुपौर्णिमेच्या माझ्याशी असलेल्या एका नव्या आप्तभावाची अनुभूती झाली. यापूर्वी हे अनाकलनीय वाटत असे—श्रीगुरूंचा सन्मान फक्त एका विशिष्ट पौर्णिमेलाच का करायचा? मग, गुरुपौर्णिमेचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न करण्याऐवजी मी अशी कल्पना करणे पसंत केले की, श्रीगुरुमाईदेखील श्री मुक्तानंद आश्रमाच्या रात्रीच्या आकाशातील पौर्णिमेच्या चंद्राचा आनंद घेत असतील. असे करताना, मला माझ्या मनात आवाज ऐकू आला, जणू श्रीगुरुमाई हळुवारपणे आणि प्रसन्नतेने 'पूर्ण' हा शब्द म्हणत आहेत. मग मी त्यांना 'पूर्ण' हा शब्द पुन्हापुन्हा म्हणताना ऐकले, त्यांचा स्वर उत्साहाने आणि आनंदाने निनादत होता.

मी विचार करू लागलो की, आनंदाची ही इतकी उत्कटता न जाणो कशी जाणवत असेल आणि माझ्या अंतरात एक उल्लासपूर्ण तेजस्विता प्रस्फुटित होत असल्याचे मला जाणवले. 'पूर्ण' हा शब्द माझ्या अंतरातून अतिशय प्रबळतेने उदित होत राहिला आणि माझ्या मनात विचार आला की, हे सर्वकाही किती संपूर्ण, किती *पूर्ण* आहे—निसर्गाची प्रचुरता, भगवंताची अविचल उपस्थिती, श्रीगुरूंची नित्य कृपा आणि त्यांचे प्रेम. आता मला कळले आहे की, मी जिला वर्षातील सर्वात महत्त्वपूर्ण पौर्णिमा म्हणून जाणतो, ती दिव्य पूर्णत्वाच्या या भावनेला स्वाभाविकपणे दर्शवते.

या वर्षी, गुरुपौर्णिमा विश्वाच्या पश्चिम भागात ४ जुलैला— आणि भारतात ५ जुलैला साजरी केली जाईल. या चंद्राचा अनुभव संपूर्ण महिनाभर घेत राहण्याचा एक मार्ग हा आहे की, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटवर 'Waxing Moon of Gurupurnima' [कलेकलेने वाढत जाणारा गुरुपौर्णिमेच्या चंद्राच्या] च्या स्तिमित करणाऱ्या त्या छायाचित्रांचे अवलोकन करणे, जी छायाचित्रे जगभरातील सिद्धयोगी या महोत्सवाच्या दोन आठवडे आधीपासून पाठवली आहेत. आता प्रत्येक दिवशी नवी छायाचित्रे या गॅलरीत पोस्ट केली जात आहेत आणि याचे समापन गुरुपौर्णिमेच्या पूर्णचंद्राच्या छायाचित्रांच्या समावेशाने होईल. तुम्हीदेखील गुरुपौर्णिमेच्या चंद्राची छायाचित्रे पाठवू शकता [Submit photographs] आणि हा महोत्सव साजरा करण्याच्या या अनोख्या पद्धतीत सक्रियतेने सहभागी होऊ शकता.

जवळजवळ प्रत्येक वर्षी मी आणि माझी पत्नी, सिद्धयोग ध्यान केंद्रामध्ये किंवा नामसंकीर्तन आणि ध्यान केंद्रामध्ये गुरुपौर्णिमेच्या महोत्सव सत्संगात सहभागी होतो, जिथे आम्ही इतर सिद्धयोग्यांसोबत नामसंकीर्तन आणि ध्यान करतो आणि आमच्या हृदयांमध्ये श्रीगुरूंच्या उपस्थितीचे आवाहन करतो. या वर्षी, वैश्विक महामारीदरम्यान, स्वतःचे आयुष्य जगत असताना आम्ही हा उत्सव घरी साजरा करणार आहोत— आणि हे सर्व मला त्या असाधारण साधनांविषयी अत्यधिक कृतज्ञतेने भरून टाकते, जी साधने सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटद्वारे श्रीगुरुमाई आपल्याला उपलब्ध करवून देत आहेत.

## भगवान नित्यानंदांची चांद्र पुण्यतिथी

१७ जुलै रोजी आपण भगवान नित्यानंदांची चांद्र पुण्यतिथी साजरी करणार आहोत—ज्या दिवशी चांद्रतिथीनुसार बडे बाबांनी आपल्या भौतिक देहाचा त्याग केला आणि ते ब्रह्मलीन झाले. वर्ष २०१२मध्ये, या पावन दिवसाच्या पन्नासाव्या वर्षदिनानिमित्त, श्रीगुरुमाईंनी एक प्रवचन दिले होते ज्याचे शीर्षक होते, 'नित्यानंदं चरणं शरणम्'. या प्रवचनात त्यांनी आपल्याला याचे स्मरण करवून दिले की, आपण कुठेही जरी असलो, तरी आपण बडे बाबांचा सन्मान करण्यासाठी "हृदयाच्या दृष्टीने" उपस्थित राहू शकतो. या वर्षी, १७ जुलैला आपण सर्वजण या महोत्सवात सहभागी होऊ शकतो, "हृदयाच्या दृष्टीने" बडे बाबांचा सन्मान करू शकतो— आपल्या नामसंकीर्तनाच्या आणि ध्यानाच्या अभ्यासाने आणि सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटवर पोस्ट केलेल्या 'श्रीअवधूतस्तोत्रम्'चे पठण करून.

## श्रीगुरुमाईंच्या नववर्ष-संदेशाचे अन्वेषण आणि अध्ययन

नुकतेच, मला माझ्या एका मित्राने मेलबोर्नमध्ये राहणाऱ्या एका सिद्धयोग विद्यार्थिनीविषयी माहिती दिली, जिने या वर्षासाठी 'श्रीगुरुमाई के नववर्ष-सन्देश पर अभ्यास-पुस्तिका'ला आपल्या सिद्धयोग अध्ययनाचे प्रमुख साधन बनवले आहे, ज्याचा अभ्यास ती दररोज करते आहे. अभ्यास-पुस्तिकेविषयीचा तिचा अनुभव विचारण्यासाठी मी त्या तरुणीशी संवाद साधला. ती म्हणाली की, तिला विशेषकरून गुरुमाईंनी प्रदान केलेले प्रश्न फारच आवडतात, ज्या प्रश्नांनी प्रत्येक अभ्यास-पत्राची [worksheet] सुरुवात होते आणि जे वर्ष २०२० च्या नववर्ष संदेशाच्या अन्वेषणाकरता एखाद्या विद्यार्थ्याला मार्गदर्शन करतात. ती युवती म्हणाली, "मी गुरुमाईंचा प्रश्न संपूर्ण आठवडाभर माझ्या बोधात धारण करते. चालत असताना, स्वयंपाक करत असताना, भांडी धुताना मी त्या प्रश्नांचा विचार करत असते. . . मला सदैव असे वाटत असे की, गुरुमाईंशी माझा संवाद होतो आहे अशी भावना मी अनुभवावी," ती पुढे म्हणाली, "आणि आता तशी ती भावना मी नेहमी अनुभवत असते."

एकाएकी माझ्या मनात विचार चमकला आणि मी विचार करू लागलो की, हेच तर आहे ते, ज्याची इच्छा आपल्यापैकी अनेकजण उत्कटतेने करतो— श्रीगुरूंशी एक गूढ आणि तरीदेखील अगाध असा मानवीय संबंध. या युवतीने सांगितलेली अजून एक गोष्ट ही होती की, या वर्षी अभ्यास-पुस्तिकेच्या अध्ययनाचा आरंभ करण्यासाठी अजूनही फारसा उशीर झालेला नाही.

***

गुरुपौर्णिमेच्या महिन्यात आपण ज्या सिद्धयोग अभ्यासावर केंद्रण करतो तो आहे दक्षिणा, श्रीगुरूंना आर्थिक स्वरूपात उपहार अर्पण करण्याचा अभ्यास. या वर्षी आपण वेबसाईटवर जाऊन एक उत्कृष्ट असे आमंत्रण '**Invitation in Honor of Gurupurnima**' पाहू शकतो, ज्यामध्ये आपल्याला दक्षिणेच्या आध्यात्मिक अभ्यासाशी संलग्न होण्यासाठी आमंत्रित केले गेले आहे. मी सदैव असे पाहिले आहे की, दक्षिणा हा श्रीगुरूंकडून प्राप्त होत असलेल्या कृपा आणि प्रज्ञान यांच्या महत्तेचा आणि विशालतेचा सन्मान करण्याचा एक आदर्श मार्ग आहे, मग भलेही आपला हा उपहार सदैव अपूर्ण आहे, असे आपल्याला वाटत असले तरीही. आपण भारताच्या संतकवींना त्यांच्या अनेक भजनांमधून आणि अभंगांमधून ऐकतो, त्यांच्या गुरूंकडून त्यांना प्राप्त झालेल्या मोक्षदायिनी कृपेविषयी वाटणारी अमाप प्रेम भावना आणि कृतज्ञता ते स्पष्टतेने व्यक्त करतात आणि तरीही ते याचीही अभिस्वीकृती करतात की अशी शंका त्यांच्याही मनात येते : श्रीगुरूंना परतफेड म्हणून काय द्यावे? जसे की संत ब्रह्मानंद गातात, "मी श्रीगुरुदेवांना कोणता उपहार अर्पण करू शकतो? तिन्ही लोकात, मला कोणतीही वस्तू भेट देण्यायोग्य दिसत नाही, कारण त्यांनी मला जो परम आनंद दिला आहे त्याची तुलना कधीही कोणत्याही गोष्टीशी, अगदी धनाच्या आणि माणकांच्या पर्वतांशीदेखील होऊ शकत नाही."

असेच असूनदेखील, आपल्याला उपहार अर्पण करण्याची *इच्छा असते*—आणि हे महत्त्वाचे आहे की आपण तसे करावे. देण्याचे कार्य जे जीवनचक्राचे एक स्वाभाविक अंग आहे, ते त्या आंतरिक रूपांतरणाला पोषित करते, ज्याचा आरंभ श्रीगुरूंनी आपल्या अंतरी केला आहे. मी तुम्हाला प्रोत्साहित करतो की, तुम्ही मार्क मॅक्लॉग्लिन यांच्याद्वारे लिखित भाष्य 'देने व पाने का रूपान्तरणकारी चक्र' [The Transformative Cycle of Giving and Receiving] याचे वाचन करावे, जेणेकरून देणे आणि प्राप्त करणे यांच्या किमयेच्या स्वरूपाविषयीचा एक व्यापक दृष्टिकोन तुम्हाला प्राप्त होईल.

उपहार अर्पण करण्याच्या स्वरूपावर चिंतन केल्यावर मी ठरवले की, दक्षिणेच्या माझ्या अभ्यासाला पुन्हा नवीनता प्रदान करण्याची माझी इच्छा आहे. अनेक वर्षे मी माझी दक्षिणा

मुख्यतः ‘Siddha Yoga Monthly Dakshina Practice’ [मासिक दक्षिणा अर्पित करने का सिद्धयोग अभ्यास] च्या माध्यमातून माझ्या बँकेच्या खात्यातून ऑटमॅटिक् ट्रॅन्सफरद्वारे [Automatic Transfer] अर्पण करत आलो आहे. माझा मासिक उपहार या बोधाने प्रेरित आहे की, दक्षिणा अर्पण करण्याचा माझा नियमित अभ्यास सिद्धयोग मिशनला निरंतरपणे पाठबळ प्रदान करतो. त्याबरोबरच, मी जिथे राहतो तेथील सिद्धयोग ध्यान-केंद्रामधील सत्संगात हॉलमधील गुरुमाईंच्या आसनासमोर प्रणाम करतानादेखील मी दक्षिणा अर्पण करत आलो आहे. अशा या दृष्टिकोनातून, मला नेहमी श्रीगुरुमाईंसमवेत असलेल्या माझ्या नात्याची सखोल अनुभूती होत असे—माझ्या जीवनातील त्यांच्या कृपेसाठी आणि त्यांच्या उपस्थितीसाठी मी कृतज्ञ असे. आता वैश्विक महामारीच्या काळात सिद्धयोग ध्यान-केंद्रे आणि नामसंकीर्तन व ध्यान-केंद्रे बंद असल्यामुळे मला ही जाणीव झाली की, दर्शन आणि दक्षिणा अर्पण करण्याच्या त्या क्षणांना मी किती मुकतो आहे.

माझ्या मनात हा विचार उद्भवला की, या परिस्थितीला मी आशीर्वादाचे रूप देऊ शकतो. मी पाहिले की मासिक दक्षिणेच्या अभ्यासाव्यतिरिक्त, प्रत्येक रात्री मी व माझी पत्नी नामसंकीर्तन व ध्यान केल्यानंतर आमच्या ध्यानकक्षातील पूजेसमोर दक्षिणा अर्पण करू शकतो. आता काही दिवसांपासून मी तसे करतो आहे आणि मला हे सांगितलेच पाहिजे की हा अनुभव खरोखरच प्रगाढ आहे—तो त्या प्रेमाच्या आणि अनुबंधाच्या भावनेला जागृत करतो जिला सिद्धयोग अभ्यासांमध्ये अनुभवण्याची इच्छा मला असते. आणि प्रत्येक महिन्याच्या शेवटी मी ही अतिरिक्त दक्षिणा एस. वाय. डी. ए. फाउंडेशनला ऑनलाईन पाठवेन. आणि बस! अशा प्रकारे, प्रत्येक रात्री मी अनुबंधाच्या त्या क्षणाचा आनंद घेऊ शकेन.

दक्षिणा अर्पण करण्याच्या शक्तीच्या या प्रत्यक्ष अनुभवाने मला यासाठी प्रेरित केले आहे की, नियमितपणे अभ्यास करण्याच्या माझ्या प्रदीर्घकालीन वचनबद्धतेच्या लाभाविषयी अधिक जागरूक होण्यासाठी मी मार्ग शोधावा. मी हा निश्चय केला आहे की, ‘देने व पाने का रूपान्तरणकारी चक्र’ [*The Transformative Cycle of Giving and Receiving*] हे भाष्य प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी मी पुन्हा वाचेन. त्या दिवशी, मी दक्षिणा अर्पण करण्याच्या माझ्या अनुभवाविषयी जर्नलमध्येदेखील लिहीन आणि श्रीगुरूंशी असलेल्या माझ्या दृढ नात्याच्या व त्यांच्याविषयी असलेल्या प्रेमाच्या माझ्या भावनेत जे रूपांतरण होते आहे, त्याविषयीदेखील मी लिहीन.

मी तुम्हाला आमंत्रित करतो की, या महिन्यादरम्यान तुम्ही यावर विचार करावा की, या मूलभूत सिद्धयोग अभ्यासाविषयीच्या तुमच्या अनुभवाला तुम्ही आणखी अधिक जिवंत व सखोल कसे बनवू शकाल.

गुरुपौर्णिमेच्या या महिन्यात आपल्यापैकी प्रत्येकाकडे ही सुसंधी आहे की, आपण आपले मन आणि हृदय आपल्या अंतरी आसनस्थ असलेल्या श्रीगुरुदेवांच्या पूर्ण प्रकाशाकडे वळवावे आणि त्या प्रकाशात मुदित व्हावे. हा महिना आपल्यापैकी प्रत्येकासाठी *वैभवाने परिपूर्ण असो,* ही शुभेच्छा!

आदरपूर्वक,
पॉल हॉकवुड

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.